# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com

Web Site : - www.ropune.org.in


**अतिमहत्वाचे / अतितात्काळ**

जा क्र विकापु / विवि / शिक्षण शुल्क / २००९-१० / ६०५० दिनांक :- 17 AUG 2009

प्रति,

प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व विनाअनुदानित
पदविका / पदवी / अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट / आर्किटेक्चर
पदव्युत्तर पदवी एम बी ए / एम सी ए संस्था

विषय :- अनुसूचित जाती कल्याण समितीची बैठक.
संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २३अ / ओडीएम / २००९ / २२६७ दिनांक ४ / ०८ / २००९.

उपरोक्त विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, दिनांक ३ / ०८ / २००९ रोजी समितीच्या बैठकीत खालीलप्रमाणे माहिती मागविण्यांत आलेली आहे. सदर माहिती समितीस तातडीने सादर करावयाची असल्याने ही माहिती त्वरीत फॅक्सने / हस्तदेय सादर करावी.

१) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क घेण्यात आले आहे काय ?
२) या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काव्यतिरिक्त आकारण्यात आलेल्या इतर शुल्काचा तपशील.
३) शिक्षण शुल्क आकारले असल्यास ते परत करण्यांत आले आहे काय ?
४) अनुसूचित जाती व्यतिरिक्त अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्याकडून शिक्षण शुल्क आकारण्यांत आले आहे काय ?
५) वरील अ.क्र.४ मध्ये नमूद प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काव्यतिरिक्त आकारण्यांत आलेल्या इतर शुल्काचा तपशील.

शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र. ईबीसी-२००३ / प्र.क्र.३०१ / मावक-२, दिनांक ०१ / ११ / २००३ नुसार अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क न करण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. **संस्थांनी अशा विद्यार्थ्यांकडून फी घेतली असल्यास अशा संस्थांवर फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याची तरतुद आहे.**

तरी उपरोक्त माहिती तंत्रशिक्षण संचालनालयास तातडीने पाठवायची असल्याने ती त्वरीत फॅक्सने / हस्तदेय / कुरिअरने उपलब्ध करुन द्यावी. **ज्या संस्था माहिती त्वरीत उपलब्ध करुन देणार नाहीत त्यांच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया तपासल्या जाणार नाही याची देखील दखल घेण्यांत यावी.**

(डी एन शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.